# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि. ११ / ११ /2020**

**|| गोषवारा ||**

प्रकरण क्र. :-१८ <u>महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी सणा निमित्त सानुग्रह अनुदान देणेबाबत.</u>

मिरा भाईंदर महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी सणानिमित्त दरवर्षीप्रमाणे सानुग्रह अनुदान देणे आहे. शासकीय कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान/बोनस देण्याबाबत राज्य शासनाचे धोरण नाही. मात्र यापुर्वी राज्य शासन, नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. जीईएन-1017/प्र.क्र.-267/नवि-24, दि.27/11/2002 अन्वये मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली व श्री. महाबळ शेट्टी, निमंत्रक, महाराष्ट्र राज्य, महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटना व सर्व महानगरपालिका आयुक्त यांचेसमवेत दि.31/10/2002 रोजी बैठक झालेली होती. सदर बैठकीत महानगरपालिका कर्मचाऱ्यांना पुढील प्रमाणे सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय झालेला आहे.

"महानगरपालिकेने कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देणे संदर्भात आपल्या आर्थिक परिस्थितीचा विचार करुन सानुग्रह अनुदान किती द्यावे याबाबतचा निर्णय आपल्या स्तरावर घ्यावा. राज्यशासन महानगरपालिकेला कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी कुठल्याही प्रकारचे अनुदान देत नसल्याने सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय घेण्यासाठी महानगरपालिकेने राज्यशासनाची पुर्व परवानगी घेण्याची गरज नाही. मात्र सानुग्रह अनुदान देतांना प्रशासन व मा. महासभा यांच्यात वाद निर्माण झाल्यास व त्यानंतर हा वाद शासनाकडे निर्णयासाठी पाठविला गेल्यास शासन अशा प्रकरणी उचित निर्णय घेईल."

वरील प्रमाणे मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दि.31/10/2002 रोजी महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटना व आयुक्त, सर्व महानगरपालिका यांच्या झालेल्या बैठकीत ठरल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. जीईएन-1017/प्र.क्र.-267/नवि-24, दि.27/11/2002 अंतर्गत उपरोक्त नमुद शासनाचे निर्देश पाहता महापालिकेने आपल्या स्तरावर सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय घेणे उचित आहे. गेल्यावर्षी मा.महासभा दि.31/01/2020 (दि.20/12/2019 रोजीची तहकुब मा.महासभा) ठराव क्र.78 अन्वये महानगरपालिकेच्या प्रतिनियुक्ती वरील अधिकारी, वर्ग-01 ते वर्ग-04 संवर्गातील अधिकारी व कर्मचारी यांना खालीलप्रमाणे सानुग्रह अनुदान मंजूर करण्यात आलेला आहे.

<u>महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी/कर्मचारी करीता</u>

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचा तपशिल | कार्यरत अधिकारी/कर्मचारी | सन 2019-20 या वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये | सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1. | महापालिका आस्थापनेवरील तसेच प्रतिनियुक्ती वरील अधिकारी, वर्ग-1 ते वर्ग-4 संवर्गातील कर्मचारी वर्ग | 1471 | 22,470/- | 3,20,66,586/- |
| 2. | संगणक चालक/लघुलेखक | 69 | 17,302/- | 11,66,443/- |
| 3. | बालवाडी शिक्षिका (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 04 | 9,887/- | 39,548/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 4. | कुष्ठरोग तंत्रज्ञ, आय.सी.टी.सी. व क्षयरोग कर्मचारी, मलेरीया पर्यवेक्षक, आर.बी.एस.के. पथक, राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 128 | 9,269/- | 11,81,023/- |
| 5. | लिंक वर्कर (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 115 | 3,531/- | 4,01,946/- |
| 6. | स्व. इंदिरा गांधी रुग्णालयामधील कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 15 | 14,212/- | 2,04,890/- |
| 7. | भारत रत्न पंडीत भिमसेन जोशी रुग्णालय | 29 | 14,212/- | 3,81,355/- |
| 8. | राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान | 05 | 9,887/- | 49,435/- |
| 9. | स्थानिक संस्था कर विभागातील ठोक मानधनावरील कार्यरत असलेले ऑडीट लिपीक | 05 | 8,539/- | 40,560/- |
| 10. | बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 40 | 14,212/- | 5,64,927/- |
| 11. | पी.एम.ए.वाय. योजनेतील कर्मचारी | 02 | 9,887/- | 19,774/- |
| 12. | सर्व शिक्षा अभियान अंतर्गत काळजी वाहक कर्मचारी | 06 | 6,179/- | 37,074/- |
| | **एकुण** | **1889** | | **3,61,53,561/-** |

<u>शिक्षण विभागातील कार्यरत शिक्षक वर्गाकरीता</u>

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचा तपशिल | शिक्षक वर्गाची संख्या | सन 2019-20 या वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये | सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1. | मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग व सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी | 178 | 19,774/- | 34,47,274/- |
| 2. | सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी/शालेय पोषण आहार अंतर्गत कर्मचारी | 23 | 17,302/- | 3,97,946/- |
| | **एकुण** | **201** | | **38,45,220/-** |

वरीलप्रमाणे महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांना मागील वर्षी सानुग्रह अनुदान एकूण रु. **3,61,53,561/-** तसेच शिक्षण विभागातील कार्यरत शिक्षक वर्गाकरीता मागील वर्षी सानुग्रह अनुदान वाटपासाठी एकूण रु.**38,45,220/-** इतका खर्च मंजुर असुन त्याप्रमाणे सानुग्रह अनुदानाचे वाटप करण्यात आलेले आहे.

महानगरपालिका आस्थापनेवर दि.31/03/2020 पर्यंत कार्यरत असलेले अधिकारी, कर्मचारी व शिक्षक वर्ग यांना मागील सन-2019 मध्ये मंजूर झालेल्या अनुदान रक्कमे प्रमाणे यावर्षी अनुदान प्रदान केल्यास होणारा अपेक्षित खर्च पुढील प्रमाणे आहे.

**<u>महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी/कर्मचारी करीता</u>**

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचा तपशिल | कार्यरत अधिकारी/ कर्मचारी | सन 2019-20 या वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये | सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1. | महापालिका आस्थापनेवरील तसेच प्रतिनियुक्ती वरील अधिकारी, वर्ग-1 ते वर्ग-4 संवर्गातील कर्मचारी वर्ग | 1452 | 22,470/- | 3,26,26,440/- |
| 2. | संगणक चालक/लघुलेखक | 69 | 17,302/- | 11,93,838/- |
| 3. | बालवाडी शिक्षिका (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 04 | 9,887/- | 39,548/- |
| 4. | कुष्ठरोग तंत्रज्ञ, आय.सी.टी.सी. व क्षयरोग कर्मचारी, मलेरीया पर्यवेक्षक, आर.बी.एस.के. पथक, राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 135 | 9,269/- | 12,51,315/- |
| 5. | लिंक वर्कर (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 116 | 3,531/- | 4,09,596/- |
| 6. | स्व. इंदिरा गांधी रुग्णालयामधील कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी)/ भारत रत्न पंडीत भिमसेन जोशी रुग्णालय | 37 | 14,212/- | 5,25,844/- |
| 7. | राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान | 05 | 9,887/- | 49,435/- |
| 8. | स्थानिक संस्था कर विभागातील ठोक मानधनावरील कार्यरत असलेले ऑडीट लिपीक | 05 | 8,539/- | 42,695/- |
| 9. | बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 41 | 14,212/- | 5,82,692/- |
| 10. | पी.एम.ए.वाय. योजनेतील कर्मचारी | 02 | 9,887/- | 19,774/- |
| 11. | सर्व शिक्षा अभियान अंतर्गत काळजी वाहक कर्मचारी | 06 | 6,179/- | 37,074/- |
| | **एकुण** | **1880** | | **3,67,78,251/-** |

शिक्षण विभागातील कार्यरत शिक्षक वर्गाकरीता

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचा तपशिल | शिक्षक वर्गाची संख्या | सन 2019-20 या वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये | सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1. | मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग व सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी | 173 | 19,774/- | 34,20,902/- |
| 2. | सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी/शालेय पोषण आहार अंतर्गत कर्मचारी | 22 | 17,302/- | 3,80,644/- |
| | एकुण | 195 | | 38,01,546/- |

वरील प्रमाणे महानगरपालिकेतील आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांना गतवर्षीच्या मंजूर रक्कमानुसार सानुग्रह अनुदान देणेसाठी रु. 3,67,78,251/- (अक्षरी- तीन कोटी सदुसष्ट लाख अठ्याहत्तर हजार दोनशे एकावन्न मात्र) खर्च अपेक्षित आहे. आणि या वर्षीच्या मंजुर वार्षिक अंदाजपत्रकात रक्कम रु.2.00 कोटी इतकी तरतुद आहे.

तसेच शिक्षण मंडळातील कर्मचाऱ्यांसाठी रक्कम रु. 38,01,546./- (अक्षरी - अडतीस लाख एक हजार पाचशे सेहचाळीस मात्र) खर्च अपेक्षित आहे. आणि या वर्षीच्या मंजुर अंदाजपत्रकात रक्कम रु.20 लक्ष इतकी तरतुद आहे.

**सबब सानुग्रह अनुदानाची रक्कम अंदाजपत्रकाच्या तरतुदीनुसार जास्त होत असल्यास त्यांचे पुनर्विनियोजन करण्याचे अधिकार मा.महासभेस आहे.** तरी मागील वर्षी प्रमाणे मा. महासभा मंजुरीनुसार या वर्षी महानगरपालिका अधिकारी/कर्मचाऱ्यांना व शिक्षक वर्गासह कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देणेबाबत **निर्णय घेणे शिफारस आहे.**

(मा.आयुक्त महोदय यांच्या दि.16/10/2020 रोजीच्या मान्यतेने)

(अजित मुठे)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि. 20/10/2020 वेळ दु.2.27 वा.
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवारा नोंद
रजिस्टर अ.क्र. 93 वर्ष :- 2020/21

नगरसचिव
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका